# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर महानगरपालिका येथील निरुपयोगी संगणक (Computer e-waste) साहित्य निर्लेखित करणेबाबत.
**{माहिती व तंत्रज्ञान विभाग}**

नागपूर महानगरपालिका मुख्यालय व झोन कार्यालयातील निरुपयोगी संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, सर्वर व इतर सर्व माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित उपकरणाचे निर्लेखन विशिष्ट शास्त्रीय पद्धतीने व शासन मान्य संस्थेकडून रीतसर निविदा प्रक्रिया करणेस मा. आयुक्त तथा प्रशासक, मनपा, नागपूर यांनी ठराव क्र. 99/मनपा/प्रशासक दिनांक:-20/09/2022 नुसार मंजुरी प्रदान केली आहे.

उपरोक्त मंजुरीनंतर रीतसर निविदा प्रक्रिया (दुसरी वेळ) करून प्राकलनिय दरानुसार रु. 1,93,200/- रक्कमेचे निर्लेखनास पात्रनिरुपयोगी संगणक साहित्य निर्लेखित करण्याकरीता दोन निविदाकारांचे आर्थिक प्रपत्र दि. 23/11/2022 ला मान्यतेनंतर उघडण्यात आल्या. त्यामध्ये मे. लीलाशना सेल्स यांनीरु. 1,79,524/- व मे.नागराज ई वेस्ट रिसायकलिंग यांनी रु. 2,18,100/- इतक्या किमतीच्या दोन निविदा सादर केल्या.

उपरोक्त पैकी मे.नागराज ई वेस्ट रिसायकलिंग यांनी सादर केलेली निविदा महत्तम दराची असल्याने त्यांना पत्र देऊन वाटाघाटी करिता दिनांक- 28/11/2022 ला बोलून प्रत्यक्ष वाटाघाटी करण्यात आल्या. त्यामध्ये दोन्ही निविदाकारांनी सादर केलेल्या निविदेतील जे दर महत्तम आहेत त्या दरामध्ये मे.नागराज ई वेस्ट रिसायकलिंग यांनी निर्लेखन करण्याचे मान्य केले. दोन्ही निविदेतील विविध साहित्यांचे दरांपैकी महत्तम दर सादर केलेल्या निविदेतील दरानुसार संपूर्ण साहित्याची किंमत रु. 2,32,981/- ईतकी होत आहे. त्याबाबत मे.नागराज ई वेस्ट रिसायकलिंग यांनीदिनांक 29/11/2022 रोजी पत्र देऊन रु. 2,32,981/- या दरानुसार संपुर्ण साहित्य निर्लेखित करावयाचे मान्य केलेले आहे.

त्यानुसार निरुपयोगी संगणक साहित्य निर्लेखित करण्याकरिता मे.नागराज ई-वेस्ट रिसायकलिंग यांच्या रु. 2,32,981/- दराच्या निविदेस निविदेतील अटी-शर्ती नुसार मंजुरी प्रदान करणे, तसेच निविदेतील B.O.Q. मध्ये नमूद साहित्यापेक्षागणनेमध्ये जास्त साहित्य आढळल्यास अंतिम केलेल्या दरानुसार मे.नागराज ई वेस्ट रिसायकलिंग यांचे कडून अतिरिक्त भुगतान प्राप्त झाल्यानंतरच अतिरिक्त साहित्य निर्लेखनाच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टीप:- सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 200/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 14/12/2022

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा. आयुक्त तथा संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका येथील निरुपयोगी संगणक (Computere-waste) साहित्य निर्लेखित करणेबाबत.

नागपूर महानगरपालिका मुख्यालय व झोन कार्यालयातील निरुपयोगी संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, सर्वर व इतर सर्व माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित उपकरणाचे निर्लेखन विशिष्ट शास्त्रीय पद्धतीने व शासन

मान्य संस्थेकडून रीतसर निविदा प्रक्रिया करणेस मा. आयुक्त तथा प्रशासक, मनपा, नागपूर यांनी ठराव क्र. 99/मनपा/प्रशासक दिनांक:-20/09/2022 नुसार मंजुरी प्रदान केली आहे.

उपरोक्त मंजुरीनंतर रीतसर निविदा प्रक्रिया (दुसरी वेळ) करून प्राकलनिय दरानुसार रु. 1,93,200/- रक्कमेचे निर्लेखनास पात्रनिरुपयोगी संगणक साहित्य निर्लेखित करण्याकरीता दोन निविदाकारांचे आर्थिक प्रपत्र दि. 23/11/2022 ला मान्यतेनंतर उघडण्यात आल्या. त्यामध्ये मे. लीलाशना सेल्स यांनीरु. 1,79,524/- व मे.नागराज ई वेस्ट रिसायकलिंग यांनी रु. 2,18,100/- इतक्या किमतीच्या दोन निविदा सादर केल्या.

उपरोक्त पैकी मे.नागराज ई वेस्ट रिसायकलिंग यांनी सादर केलेली निविदा महत्तम दराची असल्याने त्यांना पत्र देऊन वाटाघाटी करिता दिनांक- 28/11/2022 ला बोलून प्रत्यक्ष वाटाघाटी करण्यात आल्या. त्यामध्ये दोन्ही निविदाकारांनी सादर केलेल्या निविदेतील जे दर महत्तम आहेत त्या दरामध्ये मे.नागराज ई वेस्ट रिसायकलिंग यांनी निर्लेखन करण्याचे मान्य केले. दोन्ही निविदेतील विविध साहित्यांचे दरांपैकी महत्तम दर सादर केलेल्या निविदेतील दरानुसार संपूर्ण साहित्याची किंमत रु. 2,32,981/- ईतकी होत आहे. त्याबाबत मे.नागराज ई वेस्ट रिसायकलिंग यांनीदिनांक 29/11/2022 रोजी पत्र देऊन रु. 2,32,981/- या दरानुसार संपुर्ण साहित्य निर्लेखित करावयाचे मान्य केलेले आहे.

त्यानुसार निरुपयोगी संगणक साहित्य निर्लेखित करण्याकरिता मे.नागराज ई-वेस्ट रिसायकलिंग यांच्या रु. 2,32,981/- दराच्या निविदेस निविदेतील अटी-शर्ती नुसार मंजुरी प्रदान करणे, तसेच निविदेतील B.O.Q. मध्ये नमूद साहित्यापेक्षागणनेमध्ये जास्त साहित्य आढळल्यास अंतिम केलेल्या दरानुसार मे.नागराज ई वेस्ट रिसायकलिंग यांचे कडून अतिरिक्त भुगतान प्राप्त झाल्यानंतरच अतिरिक्त साहित्य निर्लेखनाच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**